डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,

छत्रपती संभाजीनगर – ४३१ ००४ महाराष्ट्र (भारत)

(नॅक समितीतर्फे अ+ दर्जा प्राप्त)

ई.पी.ए.बी.एक्स. :- (०२४०) २४०३३९९ ते ४००
कार्यालय दूरध्वनी :- (०२४०) २४०३१०७
कुलसचिव (का). :- (०२४०) २४०३३३३
Web Site :- www.bamu.ac.in
E-mail :- vc@bamu.ac.in
E-mail :- registrar@bamu.ac.in

विद्यापीठ परिसर,
छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००४
(महाराष्ट्र)

सामान्य प्रशासन विभाग

परिपत्रक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक विभागप्रमुख, प्रशासकीय विभागप्रमुख, सर्व अधिकारी, सर्व कर्मचारी तसेच विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, परिसंस्थांचे संचालक, शिक्षक व विद्यार्थी यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने दि. २० ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२३ अनुसार मूळ अधिनियमास (२०१६) जोडलेल्या अनुसूची क मधील भाग एक मधील अनुक्रमांक ४ मध्ये "डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद" या मजकुराऐवजी "डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर" हा मजकूर दाखल करण्यात आला आहे. व स्तंभ २ मधील "औरंगाबाद" ऐवजी "छत्रपती संभाजीनगर" व "उस्मानाबाद" ऐवजी "धाराशिव" असा मजकूर दाखल करण्यात आला आहे.

उपरोक्त नावबदलाची यथायोग्य नोंद घेऊन सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुखांनी उपलब्ध पॅड्स, शिक्के, लेटर हेड, छपाई झालेली लेखन सामग्री बदलून घ्यावी अथवा योग्य तो शिक्का लावावा, तसेच सर्व नामफलक बदलून घ्यावे, असे परिपत्रक विद्यापीठाने दि. २६-१०-२०२३ रोजी परिपत्रक निर्गमित केले आहे.

याबाबत असे निदर्शनास आले आहे की, अद्यापही काही विभागांकडून 'छत्रपती संभाजीनगर' ऐवजी 'औरंगाबाद' असा उल्लेख करण्यात आला आहे. मा. कुलगुरू महोदयांचे आदेशानुसार सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, दि. २६-१०-२०२३ च्या परिपत्रकाची काटेकोर अंमलबजावणी करावी.

सदर परिपत्रकाची अंमलबजावणी न करणाऱ्याविरुद्ध कडक कार्यवाही करण्यात येईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

विद्यापीठ प्रांगण,)(
छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००४)(कुलसचिव
संदर्भ :- सा.प्र./२०२६/227)(
दिनांक :- २७-१०-२०२६)(

या परिपत्रकाची प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तवः-

१) सर्व प्रशासकीय विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
२) सर्व शैक्षणिक विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
३) मा. संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपपरिसर धाराशिव.
४) सर्व संचालक, अध्यासन/संशोधन केंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
५) जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
६) संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देऊन कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर दर्शनी भागात प्रसिद्ध करण्यात यावे. तसेच सर्व प्रशासकीय विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभागप्रमुख तसेच विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य/ परिसंस्थांचे संचालक यांना ई-मेलद्वारे परिपत्रक पाठविण्यात यावे.
७) उपकुलसचिव, शैक्षणिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देऊन कळविण्यात येते की, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य/ परिसंस्थांचे संचालक यांना Portal वरून ई-मेलद्वारे परिपत्रक पाठविण्यात यावे.

कुलसचिव